सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

# जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय नांदेड

हर्ष नगर आनंद नगर रोड
दु.क. 02462 –254161
ई मेल .homeguardnanded@gmail.com

जा.क 839 जिहोगा/प्रशा /2024 दिनांक 12/10/2024

## प्रशिक्षण बाबत जाहीर सुचना

नांदेड जिल्हयातील होमगार्ड नोंदणी 2024 मध्ये अंतीम निवड झालेल्या पुरुष व महिला उमेदवारांचे प्राथमिक प्रशिक्षण दिनांक 14/10/2024 ते 30/10/2024 या कालावधी करीता पोलीस मुख्यालय नांदेड येथे आयोजीत केले आहे.

हमीपत्र भरून दिलेल्या व प्रशिक्षणास हजर राहण्यास सहमती दर्शविलेल्या पुरुष व महिला उमेदवारांना कळविण्यात येते की,सदर प्रशिक्षणास सर्व तयारीनिशी दि.13/10/2024 रोजी 16.00 वा. पोलीस मुख्यालय नांदेड येथे उपस्थित राहावे.जे उमेदवार प्रशिक्षणा करीता हजर येणार नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द केली जाईल याची नोंद घ्यावी.

उमेदवारांनी सोबत आपले 4 फोटो आधारकार्ड पॅनकार्ड सोबत ठेवावे.तसेच निवासा करीता आवश्यक साहीत्य (बेडसिट,चादर,चप्पल,इ.)प्रशिक्षण गणवेश (पांढरा टि–शर्ट 2नग,नेव्हीब्ल्यू रंगाची ट्रॅक पॅन्ट,ब्राउन पि.टी.शुज,व दैनदिन आवश्यक साहीत्य सोबत ठेवावे.) निवड झालेल्या ज्या उमेदवारांनी वैद्यकीय प्रमाणपत्र व पोलीस चारीय पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही त्या उमेदवारांनी सोबत घेवुन यावे, अन्यथा आपणास प्रशिक्षणास हजर करून घेतल्या जाणार नाही.

तसेच प्रशिक्षण कालावधी मधील भोजन खर्च उमेदवारांनी स्वतः प्रशिक्षण केद्र येथे जमा करावयाचा असुन शासनाकडुन अनुज्ञेय असणारा भोजन भत्ता व खिसा भत्ता प्रशिक्षण शिबीर संपल्यानंतर हजेरी प्रतीवेदन पडताळणी करून, आपले बॅक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.त्याच प्रमाणे गणवेश किट भत्ता शासनाकडुन अनुदान प्राप्त होताच आपल्या बॅक खात्यात जमा करण्यात येईल.

12/10/24

( सुरज गुरवे )
जिल्हा समादेशक होमगार्ड
तथा, अपर पोलीस अधीक्षक
नांदेड

OFFICE OF THE DISTRICT COMMANDANT HOMEGUARD NANDED.